जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ६१९ दिनांक - १३/०८/२०२३**

कोथरुड पोलीस स्टेशन,पुणे शहर

# शास्त्रीनगर भागात दहशत माजवणारा कुविख्यात गुन्हेगार ओंकार कुडले (टोळी प्रमुख) व त्याचे टोळीमधील ०७ सदस्यांवर मकोका अंतर्गत कारवाई

दि.०१/०८/२०२३ रोजी रात्रौ ८.१५ वा. सुमारास दत्त मंदीराजवळ,शास्त्रीनगर,कोथरूड,पुणे येथे इसम नामे ओंकार उर्फ आबा शंकर कुडले रा.सागर कॉलनी,कोथरूड,पुणे व त्याचा साथीदार याने एका कार्यक्रमाचे ठिकाणी जावून जातिवाचक शिवीगाळ करून साऊंड सिस्टीम चालविणाऱ्या इसमावर वार केला परंतु तो वार साऊंड सिस्टीमच्या मिक्सवर पडला.त्यामुळे मिक्सर फुटुन बंद पडला.सदर घटनेबाबत कोथरूड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१८८/२०२३ भादंवि कलम १२०(ब),३०७,४२७,५०४,३४,सह शस्त्र अधिनियम ४,२५ सह क्रिमीनल लॉ अमेंडमेंट कलम ३ व ७ सह अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ चे कलम ३(१)(r),३(१)(s),३(२)(va)प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्याच्या तपासादरम्यान सदरचा गुन्हा हा आरोपी नामे **१) ओंकार ऊर्फ आबा शंकर कुडले वय २८ वर्षे,रा.सध्या सागर कॉलनी,कोथरूड पुणे मुळ रा.शास्त्रीनगर,पुणे,(टोळीप्रमुख) २) अशोक ऊर्फ आशुतोष बाबासाहेब काजळकर वय २५ वर्षे,श्रीराम कॉलनी,गल्ली नं ८,सुतारदरा, कोथरूड पुणे ३) अक्षय ऊर्फ बारक्या सुनिल पवार,वय २७ वर्षे रा.फ्लॅट नंबर ए २,शिवार कॉलनी,माताळवाडी फाटा, भुगाव,जि.पुणे ४) व्यंकटेश हरीदास अंकुशे वय २७ वर्षे रा.रमाईचौक नवज्योत मित्रमंडळ,रामनगर, पुणे, ५) मयुर शंकर येनपुरे वय २५ वर्षे रा.फ्लॅट नंबर ३०१ श्रीनिवास कॉम्प्लेक्स,दौलत पेट्रोलपंप शेजारी,भुगाव,पुणे ६) आकाश दिपक लोयरे वय २३ वर्षे, रा.फ्लॅट नंबर २०८/बी,स्वप्नसिध्दी आंगण, युनिक हॉस्पिटलसमोर,भुगाव जि.पुणे, ७) ओंकार रघुनाथ साळवी,वय २४ वर्षे, रा.घर नंबर ४,गल्ली नंबर ४,कोकरे चाळ,शास्त्रीनगर पोलीस चौकीमागे,कोथरूड,पुणे व ८) गणेश दत्तात्रय शिंदे वय २८ वर्षे,रा.गल्ली नं ११,किष्कींदानगर,कोथरूड पुणे (टोळी सदस्य) यांनी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे.**

नमुद आरोपी ओंकार कुडले याने त्याचे साथीदारांसह स्वतःचे गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व दहशत प्रस्थापित ठेवण्यासाठी पुणे शहर व परीसरात दहशत निर्माण केली असुन,त्यांनी संघटितपणे व वैयक्तीकपणे,गंभीर दुखापत करणे,घातक शस्त्राव्दारे जखमी करणे,बेकायदेशीर घातक शस्त्र जवळ बाळगणे,दंगा करणे, मालमत्तेचे नुकसान करणे,पोलीसांचे आदेशाचा भंग करणे,नागरीकांना मारहाण करुन जखमी करणे,शिवीगाळ करुन व हत्यारांचा धाक दाखवुन नागरिकांमध्ये दहशत पसरवणे यासारखे गंभीर व हिंसक गुन्हे केलेले आहेत. त्यांचेवर कोथरुड व इतर पोलीस स्टेशन येथे शरीराविरुध्दचे व माला विरुध्दचे गुन्हे दाखल असुन,त्यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करुन देखील त्यांनी पुन्हा पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

दाखल गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणे कलम वाढविण्यासाठी सदर मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.सहायक पोलीस आयुक्त, कोथरूड विभाग,श्री भिमराव टेळे यांनी मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०३,पुणे शहर,श्री.सुहेल शर्मा यांचे मार्फतीने मा.अप्पर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील यांना सादर केला होता.

सदर प्रकरणी छाननी करून कोथरुड पोलीस स्टेशन पुणे शहर येथे गु.र.नं.१८८/२०२३ भादंवि कलम १२०(ब),३०७,४२७,५०४,३४,सह शस्त्र अधिनियम ४,२५ सह क्रिमीनल लॉ अमेंडमेंट कलम ३ व ७ सह अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ चे कलम ३(१)(r), ३(१)(s),३(२)(va) या गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) या कलमाचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील यांनी पुर्व मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा.सहायक पोलीस आयुक्त,कोथरूड विभाग,श्री भिमराव टेळे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री. संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ०३,श्री.सुहेल शर्मा, मा.सहायक पोलीस आयुक्त,कोथरुड विभाग़,पुणे,श्री.भिमराव टेळे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,कोथरुड पोलीस ठाणे,श्री.हेमंत पाटील, पोलीस उप-निरीक्षक,बसवराज माळी, पोलीस अंमलदार,दिपक दाभेकर, राहूल बारड, पोपट खाडे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्राणांवर बारकाईने लक्ष देवुन शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व नागरीकां मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अमंलदार यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.**त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ४८ वी कारवाई आहे.**